# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २१/१०/२०२४ (सोमवार) सकाळ**

---

## पोस्टे कुही अंतर्गत सुरगाव येथील अवैध मुरूम उत्खनन करणाऱ्या आरोपीतांवर गुन्हा नोंद

दिनांक १५/१०/२०२४ रोजी पोस्टे कुही येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता सुरगावचे सरपंच यांचे पतीकडून फोन वरून माहिती मिळाली की सुरगाव परिसरात काही लोक जेसीबी व ट्रक चे साह्याने मुरूम चोरी करीत आहेत. त्यावरून पोस्टे कुही येथील पाचगांव चौकीतील पोलिस हवालदार दिलीप लांजेवार यांना जाण्यास सांगून ते घटनास्थळी पोहोचून जेसीबी सह ट्रक ताब्यात घेऊन १) शैलेश परदेशी शिंगारे रा उंद्री २) मनीष जेतु कटोते रा सुरगाव याना ताब्यात घेतले असून त्याना विचारपूस केली असता मालक विकास पुरुषोत्तम जिचकार रा सुरगाव असल्याचे सांगितल्याने त्यास सुद्धा आरोपी करण्यात आले आहे. घटना स्थळी हजर असलेले गावातील उपसरपंच रंगराव महादेव कुमरे यांचे तक्रार नोंदवून आरोपीविरुद्ध अपराध क्र. ५२२/२०२४ कलम ३०३(२), ६२, ३(५), ४९ बीएनएस २०२३ अनुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा दिलीप लांजेवार हे करीत आहे

## विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने काटोल पोलीस स्टेशन हद्दीतील गावांमध्ये पोलीसांसह सशस्त्र सुरक्षा बल यांचा रूट मार्च

विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाणे आज दिनांक २१/१०/२०२४ रोजी १३.०० वा. पासुन ते १७.३० वा पावेतो. मा. श्री. बापु रोहोम उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम ठाणेदार काटोल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन काटोलचे पो. उपनी कृष्णा गोंगले, पोना संतोष राठोड यांचे सह सशस्त्र सिमा सुरक्षा बल चे ०१ अधिकारी, २४ जवान सह पोलीस स्टेशन काटोल शहरातील मिश्र वस्ती हत्तीखाना, पेठबुधार व ग्रामीण मध्ये येणवा, कलंभा, मसली, सोनोली, झिलपा, खापरी केने, पारहसिंगा या गावातुन सशस्त्र सुरक्षा बल च्या प्लाटून सह रूट मार्च करण्यात आला. काटोल विधानसभा क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्या करीता सदरचा रूट मार्च घेण्यात आला असुन मतदाराने मतदान करते वेळी भयमुक्त मतदान करण्यात यावे या करीता रूट मार्च घेण्यात आला आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर